# ECHO OF HIS CALL

# बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE (ECHO GROUP)

India's National Spiritual Newspaper

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. SHASHI TIWARI

VOL: XXIV YEAR OF OUR LORD JESUS CHRIST, SEPTEMBER 2022 No. 08


## पवित्र शास्त्र

**कृपया हा शास्त्र भाग पाठ करा**

नीतिसूत्रे : १५:२३-३३

२३) मनुष्य आपल्या तोंडच्या समर्पक उत्तराने आनंद पावतो;

२४) सुज्ञ इसमानें खाली अधोलोकास जाऊ नये म्हणून त्याचा जीवनमार्ग वर जातो.

२५) परमेश्वर गर्विष्ठांचे घर जमीनदोस्त करितो; पण विधवेची मेर कायम राखितो.

२६) परमेश्वराला दुष्ट कल्पनांचा वीट आहे; पण ममतेची वचने त्याच्या दृष्टीने शुद्ध आहेत.

२७) धनलोभी आपल्या कुटुंबाला त्रास देतो; पण ज्याला लाचेचा तिटकारा असतो तो वाचतो.

२८) धार्मिक मनुष्य विचार करून उत्तर देतो; पण दुर्जनांचें मुख वाईट गोष्टी बाहेर टाकिते.

२९) परमेश्वर दुर्जनांपासून दूर राहतो; पण तो धार्मिकांची प्रार्थना ऐकतो.

३०) नेत्रांचें तेज अंत:करणाला उल्लासवितें; चांगले वर्तमान हाडें पुष्ट करिते.

३१) जीवनाच्या शिक्षणाकडे जो कान देतो तो ज्ञान्यांमध्ये वस्ती करितो.

३२) जो शिक्षण अव्हेरितो तो आपल्या जिवाला तुच्छ लेखितो; जो वाग्दंड ऐकून घेतो तो ज्ञान मिळवितो.

३३) परमेश्वराचें भय सुज्ञतेचे शिक्षण होय; आधी नम्रता मग मान्यता.

# देव तुम्हाला उठवू आणि उचलू शकतो!

# GOD CAN RAISE YOU AND LIFT YOU!

पास्टर एस्. सॅम सेलवा राज

**"तो दीनांस धुळींतून उठवितो, दरिद्रांस उकिरड्यावरून उचलितो."** (स्तोत्र ११३:७)

## यहोशवा कोण होता ?

परमेश्वराचा सेवक मोशे याच्या मृत्युनंतर मोशाचा मदतनीस यहोशवा हा इस्राएल लोकांचा पुढारी झाला. "... परमेश्वराचा सेवक मोशे याच्या मृत्युनंतर परमेश्वरानें मोशाचा मदतनीस यहोशवा यांस सांगितले" (यहोशवा १:१). "ह्या गोष्टी घडल्यानंतर परमेश्वराचा सेवक नूनाचा पुत्र यहोशवा आपल्या वयाच्या एकशेंदहाव्या वर्षी मरत पावला." (यहोशवा २४:२९). पहिले वचन म्हणते यहोशवा हा मोशेचा मदतनीस होता आणि शेवटल्या वचनात त्याला परमेश्वराचा सेवक म्हणण्यात आले आहे.

"तो दीनांस धुळींतून उठवितो, दरिद्र्यांस उकिरड्यावरून उचलितो.' (स्तोत्र ११३:७). देवाला पीडीतांची, गरिबांची, गरजवंतांची आणि आजाऱ्यांची काळजी आहे. देवाने एका मनुष्याला दुसऱ्या एका मनुष्याचा सेवक होण्याची परवानगी दिली आणि नंतर त्याला स्वत:चा सेवक करून घेतले. यहोशवाचे खरे नाव होशेया होते; मोशेने त्याचे नाव यहोशवा असे ठेविले. यहोशवा म्हणजे 'प्रभु तारण आहे.' यहोशवाच्या जीवनाचे काम होते देवाने त्यांना दिलेला प्रदेशाचा ताबा घेणे. देवाने ऐंशी वर्षांच्या मनुष्याला उच्च्य स्तान देऊन त्याला अधिकार आणि स्वर्गाच्या किल्ल्या दिल्या! यहोशवा श्रीमंत कुटुंबात जन्मला नव्हता तर मिसरात एका गुलामाच्या कुटुंबात जन्मलेला होता.

जळत्या झुडपातून देवाने मोशेला नावाने हांक मारीली. शौल दमास्कसच्या वाटेवर असताना त्याने वाणी ऐकली, "शौला, शौला" परंतु यहोशवाला नावाने हांक मारण्यात आली नव्हती किंवा त्याला चिन्ह किंवा दृष्टांत देखील प्राप्त झाला नव्हता. त्याला वृद्ध मोशेचा मदतनीस करण्यात आले होते, आणि त्यानंतर मोशेने त्याला देवाविषयी शिकविले. यहोशवाला एका वृद्ध मनुष्याचे ऐकून देवाचे सामर्थ्य प्राप्त झाले.

आपल्याला ठाऊक आहे कि प्रत्येक व्यक्तिला वेगळे पाचारण असते. कोणीहि एक दुसऱ्यापेक्षा उत्कृष्ट किंवा कमी दर्जाचा असा नसतो मोशे हा जड जीभेचा होता, तो लढाईचे कौशल्य शिकला आणि

(...पान ३ वर)

ECHO OF HIS CALL - (1969-2019 GOLDEN JUBILEE YEAR)



# तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...



"धार्मिक खजुरीसारखा समृद्ध तो लबानोन वरल्या गंधसरुसारखा वाढेल".
(स्तोत्र ९२:१२)

### आमचे कार्याविषयीचे धोरण

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.


CHIEF EDITOR
Angeline Selvakumari Henry, M.A., M.Ed.

MANAGING EDITOR
Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.

ADMINISTRATION
Bro. N. Prakasam, M.A., General Manager

EDITORIAL BOARD
Sis. Jesy Veena Sam
Sis. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Rev. Dr. K.R. Rajasekaran
Dr. A. Richard Samuel, M.A., Ph.D.

EDITOR, PUBLISHER & PRINTER
Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 95661 31858

CORE LEADERS
Bro. K. Puratchivendan
Bro. A. Edward Durai
Bro. A. Alvin
Bro. K. Abraham
Sis. Dhanalakshmi Chinnaiah

E.mail ID
sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in

WEBSITES
www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.com

YOUTUBE CHANNEL
Echo of His Call


प्रभुमधील अति प्रियांनो,

"**देव आपला पिता व प्रभु येशू ख्रिस्त यांजपासून तुम्हास कृपा व शांति असो.**" (फिलेमोन १:३)

प्रभुमधील तुमच्या सुदृढ स्वास्थाबद्दल आणि समाधाना बद्दल विश्वास बाळगुन, आम्ही दररोज प्रभुने तुम्हाला आशीर्वाद देवून तुमचे रक्षण करावे अशी प्रार्थना करित आहोत. आपला प्रभु व तारणारा प्रभु येशू ख्रिस्त, हा आपल्या प्रार्थनांना उत्तर देतो आणि मोबदला देतो तो निश्चितच तुम्हाला आशीर्वाद देईल. तो तुमच्या पाखर घालील. (स्तोत्र ९१:४)

तो तुमच्या वरील कठीण वेळ निघून जाऊ पर्यंत तुम्हांस त्याच्या पंखांखाली आश्रय देईल. त्यामुळे धीट रहा आणि घाबरु नकोस, अरिष्टें टळून जात तोर्पत त्याच्या पक्षच्छायेचा आश्रय करीन. (स्तो ५७:१) देवाचा सामर्थी हात तुम्हांबरोबर आहे.

अनेक अडखळणे असताना देखील आम्ही आमच्या '**एको ऑफ हिज कॉल**' सेवा कार्यांतील प्रत्येक विभागाचे कार्य क्रम पद्धशीरपणे आयोजीत आहोत. देव प्रत्येक दिवशी आत्म्यांची भर घालीत आहे. दुसऱ्या बाजूला आम्हाला आमच्या शक्तिच्यापलीकडे शत्रूशी झगडण्यात, आर्थीक गरजा आणि इतर अनेक लिहिता न येणाऱ्या समस्यांच्या ओझ्यांना सामोरे जावे लागत आहे. प्रभुची स्तुति असो, कि आम्हाला देवाच्या कृपेने त्यावर विजयी होणे शक्य होत आहे. आम्ही देखील तुमच्यासारखेच तीव्र भावना असलेली माणसे आहोत. कृपया आमच्याकरिता आग्रहाने प्रार्थना करित राहा. तुमच्या प्रार्थनांबद्दल आणि आधाराबद्दल आम्ही ऋणी आहोत.

देवाने अगदी योग्य अशा वेळेस रेव्ह. डॉ. के. आर. राजशेखरन आणि डॉ. अे. रिचर्ड सॅम्युएल यांना आश्चर्यकारकरित्या आमच्याशी जोडले. देव चांगला आहे. त्याची स्तुती आणि गौरव असो. अभिनंदन! आमच्या प्रिय बंधुनो!!



रेव्ह. डॉ. के. आर. राजशेखरन



डॉ. अे. रिचर्ड सॅम्युएल

५४ वी वार्षिक सभा आणि नवीन कामगारांची प्रतिष्ठापना सभा दिनांक ६ आणि ७ ऑगस्ट रोजी आमच्या **एको ऑफ हिज कॉल** मुख्य उपासना मंदिरात संपन्न झाली. देवाने आमचे मित्र असलेले; आणि चेन्नई शहारातील वरिष्ठ पाळक, पास्टर एस्. अब्राहाम यांचा सामर्थ्यशाली रितीने उपयोग करून घेतला. माझ्या मुलीने; अँन्जेलीना इने त्यांच्या संदेशाचे तामीलमधून इंग्रजीत भाषांतर केले. बहिण ऱ्हेमा गेथसी अॅलेक्स सॅमसन, बंधु जे. सॅम्युएल आणि बहिण कांथा यांना **एको ऑफ हिज कॉल** पूर्णवेळ सेवेत अधिकृतपणे सामावुन घेण्यात आले. अमच सन्माननिय बंधु के. के. पुराटीचीवेंथन, अे. एडवर्ड दुराई, ए. ऑलविन, के. अब्राहाम आणि बहणि धनलक्ष्मी चीन्नाया यांची तीन वर्षाकरिता (बोर्ड मेंबरस् म्हणून) प्रतिष्ठापना करण्यात

Our Ministries: ECHO OF HIS CALL Monthly Magazines (16 languages) BIBLECOR - Postal Courses (3 languages) Online Courses Theological Correspondence Courses (2 languages) Church Planting Nehemiah Bible Colleges Gospel Printing Press Great Commission Partners St. Paul's Matriculation School Crusades Community Development

आली. आमची खात्री आहे की देव भविष्यात आमची सेवा अधीक वरच्या पातळीवर नेईल. प्रभु करो त्याच्या येण्यापर्यंत **एको ऑफ हिज कॉल** सेवेला मार्गदर्शन करुन राखून ठेवो. आणि जे तुम्ही आमचे बळकट आधार आहात, त्या तुम्हा सर्वांना विपुल आशीर्वाद देवो मागील ५३ वर्षे आमच्या सोबत सेवेमध्ये ज्या सर्वांनी प्रवास केला, त्या सर्वांना शुभेच्छा आणि आशिर्वाद देत आहोत. आमच्या चांगल्या मित्रांपैकी एक बंधु केन यांनी ई.मेल द्वारे जाहिर केले, **''प्रिय बंधु सॅम, ५४ वर्षे हे अतिशय आश्चर्यकार असे आहे.''** हे आमच्या ऱ्हदयाला स्पर्श करून गेले!! प्रभु येशूची स्तुति असो!!! सेवा कार्याच्या अगदी सुरवातीपासून आमच्या सोबत असलेल्या आणि आता तुमच्यासारख्या नव्याने सामील झालेल्या तुम्हा सर्वांना आम्ही सन्मान देत आहोत. **''ज्याने स्वपुत्र येशू ख्रिस्त आपला प्रभु याच्या सहभागित्वात तुम्हांस बोलाविले, तो देव विश्वसनीय आहे.''** (१ करिंथ १:९).

आम्ही या महान अशा प्रसंगी, आमच्या सर्व बोर्ड मेंबर, मंडळीचे सभासद आणि सेवक वर्ग, मासिकाचे वाचक, सहसंपादक, प्रार्थना भागिदार, विश्वासातील भागीदार, आजीवन भागीदार, वर्गणीदार, महान आज्ञापालनातील भागीदार, मिशनरी, शाखा पाळक, राज्य समन्वयक, परदेशांतील मित्रगण, स्टाफ, **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल, नहेम्या बायबल कॉलेज** आणि कार्यालय इत्यादी सर्वांना नम्रतापूर्वक शुभेच्छा प्रकट करीत आहोत. १९६९ सालापासून ते आजपर्यंत ज्या प्रकारे देव आम्हांस चालवीत आला, यांचा विचार करतो, तेव्हा आमचा प्रभुमधील आनंद ओसंडून वाहातो!

प्रभु तुम्हा सर्वांना आशीर्वाद देवो. आमेन.

**ख्रिस्त येशूमधील तुमचे दास,**

**पास्टर एस. सॅम सेलवा राज आणि ॲलेक्स सॅमसन सॅम**
(+91) 98412 71858 / 98410 71858,
E.mail : samselvaraj333@gmail.com

(पान १ वरुन)

बळकट, मजबूत बनला. त्याला त्याचे लक्ष आकर्शित करण्याकरिता बोलणाऱ्या जळत्या झुडपाची गरज भासली. जंगलात एक झुडुप जळत होते; तरी देखील ते भस्म झाले नाही. आजूबाजूला कोणी देखील नव्हते; तरी त्याला ''मोशे, मोशे'' अशी वाणी ऐकू आली अशा परिस्थितीत कोणताहि मनुष्य घाबरुन गेला असता. जर देवाने मोशेला सांगितले असते, ''कृपया, माझ्या लेकरांना मिसरच्या गुलामगीरितून बाहेर काढ'', तर निश्चितच त्याने ती सुचना स्विकारली नसती. त्यासाठी त्याला प्रथम देवाचे भीतिदायक सामर्थ्य दिसणे गरजेचे होते.

यहोशवा हा वेगळ्या स्वभाव वृत्तीचा होता. देवाचा शब्द ऐकण्यासाठी त्याचे मन तयार होते. त्यामुळेच देवाने मोशेला त्याच्या जागी सरळ. पुढे मागे न पहाता, अभिषेक करण्यास सांगितले.

तुम्ही देवाच्या शब्दाचे पालन करता तेव्हा तुम्हाला त्याच्या आशीर्वादाचा आनंद उपभोगता येतो. देव सर्व गोष्टि योग्य समयी करीत असतो. आपण सर्व गोष्टि जलद घडाव्या अशी अपेक्षा करीत असतो. आपल्या गतीशी देवाचा समय जुळत नाहि. यामुळे, अनेकांना जीवनात विलंब अनुभवण्यात येतो जसा, त्यांच्या शिक्षणात विलंब, आजारांतून बरे होण्यास, वैयक्तिक जीवनात आशीर्वाद प्राप्त होण्यात विलंब इत्यादी. अशा गोष्टि घडतात, तेव्हा त्याचा अर्थ देवाला आपल्या विसर पडला आहे असा होत नाहि. उलट, देव काहितरी अधीक उत्तम करणार असतो. आपण स्वत:स नम्रपणे त्याच्या सामर्थी हातात सोपून द्यावे. तेव्हा देव तुम्हाला आशीर्वाद देईल आणि तुम्ही गमाविलेले सर्व तुम्हाला पुन: प्राप्त होईल. तुमचे प्रकृति स्वास्थ्य देखील. देव तुमच्या आयुष्याची मर्यादा वाढवील.

जेव्हा देव एखादया व्यक्तिला दास्यत्वातून-गुलामीतुन दारिद्र्यातून आणि अपुरेपणातून वर काढीतो, त्याला तो राजासमोर उभा करितो. यहोशवात बदल होऊन तो अनेक वर्षे जेता आणि शास्ता-न्यायाधीश होता.

## १) असंदिग्ध विश्वासाचा शब्द -

देवाला जर एकादे अद्भूत कृत्य करावयाचे असेल, तर आपण त्याच्या शब्दावर आणि आश्वासनावर विश्वास ठेवलाच पाहिजे. आपण गणना या पुस्तकातील १३ आणि १४ अध्याय वाचतो, तेव्हा आपल्याला दिसते की, मोशेने इस्त्राएलाच्या बंशातील



प्रमुख व्यक्तिंना कनान देश वस्तीकरिता योग्य आहे कां हे पहाण्यास हेर म्हणून पाठविले. देश हेरुन परतल्यानंतर त्यांनी सांगितले त्या देशचे रहिवाशी महाबलवान आहेत आणि तेथे जाणे अशक्य आहे. यहोशवा देखील देश हेरण्यास गेला होता. त्याने देखील तेथील लोक उंच आणि इस्त्राएलांपेक्षा बलवान आहेत हे पाहिले. परंतु त्याने त्याला महत्त्व दिले नाहि, त्याने सांगितले, **''जो देश हेरीत आम्ही चोहोंकडे फिरलो तो अतिशय उत्तम आहे. दुधामधाचे प्रवाह वाहणारा देश आहे.''** (गणना १४:७-८) त्याने खात्रीचा अहवाल दिला.

आमच्या मूळच्या मोडकळीस आलेल्या अवस्थेतील प्रार्थना मंदिराच्या दुरुस्तीकरिता आमच्याकडे पैसे नव्हते. आमच्या कार्यालयासाठी जागा नव्हती आणि उपासना घेणे कठीण झाले होते. आम्ही विश्वास ठेविला कि देव आमच्याकरिता सर्व काही करणार आहे. विश्वासाचे खात्रीपूर्वक शब्द आले. - ''सहा महिन्यांच्या कालावधीत प्रार्थना मंदिर तयार होईल, मुद्रणालय सुरु होईल - इमारत अतीशय सुंदर अशी बांधण्यात येईल.'' आमच्याकडे काही नीधी उपलब्ध होता कां? कोणी दान देणाचे आश्वासन दिले होते कां? कोणी पैसे दिले होते कां? कोणीहि नाहि. तरी देखील आम्ही त्याच्या आश्वासनावर विश्वास ठेवून कामास

सुरूवात केली आणि आमच्या सर्व गरजा पूर्ण झाल्या. पूर्वनियोजीत आराखड्यानुसार इमारत उभी राहिली तीहि अगदी वेळेनुसार. आज तीच सुंदर अशी उंच इमारत आपण पाहात आहोत. देव पुरवठा करणार. तुमचे सर्व कर्ज संपुष्टात येईल, तुमचे अश्रु पुसले जातील, कठीण परिस्थिती निघून जाईल, देव या सर्वांकडे लक्ष देईल.

## २) मदतनीस असा यहोशवा -

यहोशवा मोशेचा विश्वासू मदतनीस होता. देवाने तुम्हाला आशीर्वाद द्यावा अशी इच्छा करीत असाल तर तुमच्या मनात सेवेची भावना असली पाहिजे. असेच लोक उच्च पदावर जातात. महान अशा राष्ट्रिय पुढाऱ्यांच्या जीवनाकडे जेव्हा तुम्ही पहाता तुम्हाला असे वाटते की त्याने अगदी सहजरित्या ते पद प्राप्त झाले असेल. परंतु अगदि जवळून त्यांच्या जीवनाकडे पाहिले तर कळून येई कि,



त्यांच्या पैकी अनेकांना पुष्कळसा त्याग करावा लागलेला आहे. त्यांनी केलेल्या त्यागाचा सन्मान करून देवाने त्यांना वर उचलले. देव जे काही बोलतो, ते तो पूर्ण करतो. ''...धन्य तो इस्राएलचा देव, परमेश्वर, त्याने स्वमुखराने... वचन दिले होते... त्याने आमच्या हातांनी ते पूर्ण केले.'' (२ इतिहास ६:४)

''तुम्हांमध्ये जो कोणी पहिला होऊ इच्छितो त्याने तुमचा दास व्हावे'' (मत्तय २०:२७) ज्याला पहिले व्हावे असे वाटते, त्याने प्रथम दासाप्रमाणे तुमची सेवा करावी, तेव्हाच देव त्याला आशीर्वाद देवून महान असा पुढारी बनवील.

मी १९६९ साली 'वारुगायीन युथान' या तामिळ मासिकाचे संपादक बंधु. एस्. देवदासन यांच्या हाताखाली काम करित होतो. कामावर रुजु झाल्या बरोबर, मला कार्यालय आणि त्यामधील सर्व टेबल स्वच्छ करण्याचे काम सोपण्यात आले. कोणत्याहि प्रकारे आढेवेढे न घेता, मी आनंदाने ते काम स्विकारले. दिवस-महिने-वर्ष सरत गेले, मी मला सोपविण्यात आलेले काम करीत होतो. एके दिवशी संपादकांनी मला, ''देवाचा आत्मा तुजवर आहे, तूं सर्व गोष्टित हुशार आहेस'' असे म्हणून त्यांच्या सर्व जबाबदाऱ्या आणि कार्यालयाच्या किल्या माझ्या हातात दिल्या. देव मला पदोन्नती देण्याबद्दल संपादकांच्या मनाशी बोलला. त्याचा अभिषेक आणि प्रेम मजवर आले आणि मी देवाचा दास बनलो. आपण सेवेच्या आत्म्यानें भरले गेले पाहिजे.

हल्लीच्या दिवसात, पुष्कळसे लोक मोठे उपदेशक आणि पुढारी बनण्याकरिता पुढे येतात. परंतु त्यांची परिपक्व आत्मिक जीवन जगलेल्या अशा चांगल्या देवाच्या सेवकाच्या हाताखाली प्रशिक्षित होण्याची तयारी नसते. आत्मिक जीवनातील खरे टप्पे समजुन न घेताच अनेकांना स्वत:स रेव्हरेंड, डॉक्टर, बिशप, पास्टर, देवाची देणगी प्राप्त असलेला, आंतरराष्ट्रीय उपदेशक इत्यादी नावाने ओळखले जावे असे वाटते. अशी इच्छा बाळगणारे फारच लवकर मोहपाशांत किंवा अडचणीत गुंतले जातात, आणि त्यांची आत्मिकता गमावून बसतात. प्रत्येकाने पवित्र आणि आत्मिक अशा देवाच्या दासाच्या हाताखाली प्रथम काम करून त्याचे उदात्त स्वभाव गुण, सबई आणि देवभिरु स्वभाव शिकून घेऊन त्या चांगल्या गुणांचे अनुकरण करणे आवश्यक आहे.

मी माझ्या प्रभुच्या सेवाकार्यातील जीवनात स्वर्गीय पास्टर एस्. देवदासन यांच्याकडून पुढील तीन उत्तम गुण शिकलो-

### अ) वक्तशीरपणा -

कोणतेहि काम करावयाचे असते, ते योग्य समयात प्राधान्यतेच्या तत्त्वावर केले पाहिजे. कामासाठी जात असताना निसर्गाद्वारे येऊ शकणारे अडखळणे जसे पर्जन्य वृष्टि किंवा वारा आणि वाहनाच्या

(...पान ६ वर)


नहेम्याह बाइबल कॉलेज
रेसिडेन्शल कॉलेज, चेन्नई।

माध्यमः हिन्दी

सदस्यता के लिए पंजीकृत उम्मीदवार - ATA

सुविख्यात अंतर्राष्ट्रीय मसीही अगुवे तथा पिछले 53 वर्षो से सेवारत वरिष्ठ पासवान

सर्टिफिकेट इन थियोलॉजी – 1 साल
डिप्लोमा ऑफ थियोलॉजी – 2 साल

योग्यता 10 वी या अधिक
जल्दी करें!

Contact : The Chairman, Nehemiah Bible College.
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org
★ ऑनलाइन कक्षाएं उपलब्ध हैं ★

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार प्रार्थना विनंत्या

प्रार्थना स्तुति आणि मुद्दे १९ सप्टेंबर २०२२ ते १८ ऑक्टोंबर २०२२ पर्यंत

ओझी वाहाणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)

## स्तुति करिता मुद्दे

**१९ सप्टेंबर** : १९६९ सालापासून मासिक प्रकाशन सेवेवर असलेल्या त्याच्या आशीर्वादाबद्दल.

**२० सप्टेंबर** : **नहेम्या बायबल कॉलेज**साठी निवासी आणि सायंकालीन विद्यार्थी पुरविल्याबद्दल.

**२१ सप्टेंबर** : आमच्या मुद्रणालयात १६ भाषांमध्ये मासिक छापून ते मिशन क्षेत्रामध्ये पाठविणे शक्य होऊ दिले.

**२२ सप्टेंबर** : आमच्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांवर वर्षविलेल्या अशीर्वादाबद्दल.

**२३ सप्टेंबर** : आमच्या प्रार्थना भागीदार, वर्गणीदार, विश्वासातील भागीदार, आजीव भागीदार, महान आज्ञापालनातील भागीदार आणि या सर्वांच्या कुटुंबाबद्दल.

**२४ सप्टेंबर** : पत्रव्यवहाराद्वारे करण्यात येत असलेल्या बायबलकोर आणि थियॉलॉजीकल अभ्यासक्रमात झालेल्या वाढीबद्दल.

**२५ सप्टेंबर** : सहसंपादक आणि त्यांच्या कुटुंबावरील देवाच्या आशीर्वादाबद्दल.

**२६ सप्टेंबर** : आमच्या मुख्य मंडळीबद्दल आणि शाखा मंडळ्यांबद्दल व त्यांच्या विश्वासणाऱ्या सभासदाबद्दल.

**२७ सप्टेंबर** : प्रकाशन सेवेसाठी रेव्ह. डॉ. के. आर. राजशेखरन यांना नवीन सहसंपादक म्हणून दिल्या बद्दल.

**२८ सप्टेंबर** : आमच्या **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल**च्या प्रिन्सिपल, शिक्षक आणि इतर स्टाफबद्दल.

**२९ सप्टेंबर** : **एको ऑफ हिज कॉल** सेवेतील सर्व स्टाफ आणि त्यांच्या कुटुंबियांबद्दल.

**३० सप्टेंबर** : जुलै महिन्यातील सर्व गरजा पुरविल्याबद्दल.

**०१ ऑक्टोंबर** : नित्यनियमाने सेमिनार आयोजीत करणे शक्य होऊ देत आहे त्याबद्दल.

**०२ ऑक्टोंबर** : विविध सेवाकार्याच्या माध्यमांतून सुवार्ता प्रसार करण्याच्या वरिष्ठ पाळकांच्या समर्पितपणाबद्दल.

**०३ ऑक्टोंबर** : आमच्या मंडळीत नवीन विश्वासणाऱ्यांनी भर घालून आशीर्वादीत केल्याबद्दल.

## प्रार्थने करीता मुद्दे

**०४ ऑक्टोंबर** : संपूर्ण जगभरातील विश्वासणाऱ्यां मध्ये देवा प्रती प्रामाणिकता असावी.

**०५ ऑक्टोंबर** : संस्थेवर आणि सर्व स्टाफ व कुटुंबाना देवाने आशीर्वाद द्यावा.

**०६ ऑक्टोंबर** : देवाने आमच्या वरिष्ठ पाळकांना त्यांचे जीवन चरित्र लिहिण्यात ऱ्हदयाचा विशालपणा द्यावा.

**०७ ऑक्टोंबर** : सर्व धर्मात आणि देशांत ऐक्य प्रस्तापित व्हावे.

**०८ ऑक्टोंबर** : **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल**मध्ये प्रवेशासाठी नवीन विद्यार्थी मिळावेत.

**०९ ऑक्टोंबर** : आमच्या सर्व सहकारी, राज्य समन्वयक आणि त्यांच्या कुटुंबाकरिता

**१० ऑक्टोंबर** : शुभवर्तमान मुद्रणालयावर देवाने आशीर्वाद पाठवावा.

**११ ऑक्टोंबर** : जगातील सर्व लोकांच्या सुरक्षिततेसाठी.

**१२ ऑक्टोंबर** : देवाने या महिन्यातील सर्व गरजा पुरवाव्यात.

**१३ ऑक्टोंबर** : सर्व मद्यपी आणि दुष्कृत्ये करण्यात गुंतलेल्यांनी पश्चाताप करावा.

**१४ ऑक्टोंबर** : जगातील सर्व स्त्रिया आणि लेकरांच्या सुरक्षतेकरिता.

**१५ ऑक्टोंबर** : या पृथ्वीवर त्याचे राज्य स्थापण्याचा दृष्टिकोन आपल्याला द्यावा.

**१६ ऑक्टोंबर** : **एको ऑफ हिज कॉल**च्या तरुणांमधील आणि बाह्य सुवार्ता सेवेसाठी.

**१७ ऑक्टोंबर** : सुवार्ता न पोहचलेल्या सर्वांपर्यंत ती नेणे शक्य व्हावे यासाठी.

**१८ ऑक्टोंबर** : आमचे वरिष्ठ पाळक, पास्टर एस्. सॅम सेल्वाराज आणि त्यांच्या कुटुंबाच्या सुदृढ प्रकृति स्वास्थ्यासाठी.

(...पान ४ वरुन)

वाहतुक रहदारीमुळे रस्ता बंद होणे इत्यादी विचारात घेऊन निघताना वेळेच्या थोडे आधी निघावे. कामावर किंवा उपासनेला कधीही उशीरा पोहचू नये. उशीर झाला तर निश्चितच अपयशाला सामोरे जावे लागणार.

**ब) जबाबदारी -**

अगदी छोटेसे काम देखील जबाबदारीची जाणीव ठेवून करावे. कोणतेहि काम उत्कृष्ठ, अगदी बरोबर करावे. एका तामिळ म्हणीनुसार, जे जबाबदारीच्या पदावर आहेत, अशांनी त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्यांच्या गरजा लक्षात ठेविल्या पाहिजेत. ती म्हण अशी;

१) आपण जे कांही करतो, त्यासाठी आपल्या सर्व ज्ञान आणि बुद्धिचा वापर करावा.

२) आपण सर्व कांही खात्रीपूर्वक आणि आपली कार्यक्षमता, ज्ञान आणि देवाचे भय बाळगून करावे.

उदा. कांही जणांना स्वत: केलेले काम तपासण्याची सवय नसते. त्यांना त्यांनी केलेल्या कामाबद्दल पर्वा नसते. या लोकांना असे वाटते, ''जे माझ्या पेक्षा वरच्या पदावर आहेत, ते जर माझ्या चुका शोधून काढण्यात तरबेज आहेत, तर मी त्या नंतर दुरुस्त करु शकतो.'' हा कल धोकादायक आहे. सर्व काही परिपूर्णेने करण्याची जाणीव ठेऊन ते केले पाहिजे. जर काही चुकले तर त्याबद्दल आपल्याला लाज वाटावी व ती पुन: होणार नाही याविषयी खात्री बाळगावी.

**क) वैयक्तिक सहभाग -**

प्रत्येक कर्तव्यकर्म वैयक्तिक रित्या केले पाहिजे. तुम्हाला जर असे वाटते कि, हे माझे काम नाही; ही माझी स्वत:ची मालमत्ता नाही, मला या प्रयत्नामधील लाभ किंवा तोटा यात रस नाही.'' तर तुम्ही निश्चितच अपयशी ठराल.

तुम्ही एखाद्या संस्थेत स्वच्छता कामगार असाल किंवा उच्च पदावर असाल. तर ते काम, ती जबाबदारी केवळ करावयाचे म्हणून करावयाचे नाही तर मनलावून, आनंदाने ते करावे. तरच तुम्ही जीवनात वरच्या पदावर जाऊ शकता.

वडीलधाऱ्या मंडळीकडून शिकण्याची नेहमीच तयारी ठेवावी.

## ३) यहोशवर अधिकाराने बांधील आहे

अमालेक येऊन रफीदीम येथे इस्राएल लोकांशी लढू लागला (निर्गम १७:८). तेव्हा मोशाने यहोशवाला सांगितले काही पुरुष निवडून अमालेकाशी जाऊन युद्ध कर. यहोशवा मोशेच्या आज्ञेनुसार ताबडतोब युद्धास गेला. आपल्या वरिष्ठांची आणि देवाची देखील आज्ञा न पाळणारे पुष्कळ लोक आहेत! केवळ तेच लोक, जे त्यांच्या वरिष्ठांची आणि देवाची आज्ञा पाळतात - आज्ञाधारक असतात, उत्तम पुढारी बनू शकतात आणि अधिकार गाजवू शकतात. यहोशवा अधिकाऱ्याचा मान राखीत होता. मोशेने त्याला युद्धावर जाण्यास सांगितल्या बरोबर तो युद्ध-भूमीवर गेला. मला युद्धाचे प्रशिक्षण नाहि, मी सैनिक नाही असे बोलून त्याने दिलेल्या जबाबदारीतून पळ काढण्याचा प्रयत्न केला नाही, तर तत्काळ आज्ञापालन केले.

## ४) यहोशवाने निवास मंडपात सेवा केली-

यहोशवा एक चांगला पुढारी होता. देवाला प्रिय असा पुरुष, यहोशवाचे निवास मंडपावर प्रेम होते.''... नूनाचा पुत्र यहोशवा हा तरुण पुरुष मंडप सोडून बाहेर येत नसे.'' (निर्गम ३३:११). देव मंडळीवर आणि मंडळीच्या कार्यावर प्रेम करणाऱ्या सर्वांना उच्च पदावर नेतो. पुढाऱ्यांनी मंडळींच्या सभासदांना अगदी कडक शब्दात उपासनेला उपस्थीत रहाण्यास सांगावे. देवाला मंडळीने एकत्र येणे आवडते. मंडळीची निवड करा आणि तिच्या प्रत्येक कार्यात सहभागी व्हा. अशामुळे न मागताच तुम्हाला देवाचा आशीर्वाद प्राप्त होईल.

आजच्या या जगात, लोकांना उपासना मंदिरात एकत्रीत होऊन उपासना करण्याची

(...पान ९ वर)


# नहेम्या बायबल सायं कॉलेज
## चेपोक आणि संतोषपूरम, चेन्नई

माध्यम : तमिळ

ATA NEHEMIAH BIBLE COLLEGE CHENNAI

विद्यार्थी ATA सभासद नोंदणीस पात्र

**आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ट पाळकांद्वारे ५३ वर्षांपासून मान्यता प्राप्त**

**सर्टिफिकेट इन थियॉलॉजी : कालावधी एक वर्ष**

**डिप्लोमा इन थियॉलॉजी : कालावधी दोन वर्षे**

**शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक**

**प्रवेशा करिता त्वरा करा !**

**Contact : The Chairman, Nehemiah Bible College.**

10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, BELLS ROAD, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

## कृपया आमच्या मुख्यालयातील सेवाकार्याकरिता प्रार्थना करा

| | | |
|---|---|---|
| १. | प्रार्थना सेवा | : २४ तास |
| २. | बायबलकोर | : पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम : इंग्रजी, तामिळ आणि हिन्दी |
| ३. | एको ऑफ हिज कॉल | : मासिक : इंग्रजी, तामिळ, मल्यालम, तेलगु, हिन्दी, कन्नड, मराठी, गुजराथी, बंगाली, ओरिया, नेपाळी, आसामी, पंजाबी, उर्दु, सिंहली आणि आफ्रिकन |
| ४. | नहेम्या बायबल कॉलेज (दोन केंद्र) (सायंकालीन / निवासी) | |
| ५. | पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजीकल अभ्यासक्रम : इंग्रजी आणि तामिळ | |
| ६. | महान आजापालनाचे भागीदार (पाळकांचे नेटवर्क) | |
| ७. | प्रशिक्षण कार्यक्रम | |
| ८. | महासभा | |
| ९. | छापील साहित्य वाटप आणि पाठ पुरावा | |
| १०. | शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय : | प्रकाशने |
| ११. | सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल | : गावातील इंग्रजी माध्यम हायस्कूल |
| १२. | शब्बाथ शाळा | : सकाळी ८.३० आणि सायंकाळी ४ वाजता - रविवारी |
| **१३.** | **तामिळ उपासना** | **: सकाळी ८.०० आणि १०,०० वाजता - रविवारी** |
| **१४.** | **हिन्दी उपासना** | **: सायंकाळी ४ वाजता - रविवारी** |
| **१५.** | **तेलगु उपासना** | **: सायंकाळी ५ वाजता - रविवारी** |
| **१६.** | **इंग्रजी आणि तामिळ उपासना** | **: सायंकाळी ६ वाजता - रविवारी** |
| १७. | पाळकांचे समुपदेशन | : सायंकाळी ४ वाजता - रविवारी |
| १८. | स्त्रियांची प्रार्थना | : सायंकाळी ५.३० वाजता - बुधवारी |
| १९. | साप्ताहिक शास्त्राभ्यास | : सायंकाळी ६.३० वाजता - बुधवारी |
| २०. | पुरुषांची प्रार्थना | : सायंकाळी ७ वाजता - शुक्रवारी |
| २१. | शिष्यत्वाची सभा | : सायंकाळी ६ वाजता - शनिवारी |
| २२. | गृह प्रार्थना सभा | : सायंकाळी ६.३० वाजता - मंगळवारी/गुरुवारी |
| २३. | विशेष प्रभु भोजन | : पहाटे ६ वाजता प्रत्येक महिन्याच्या १ल्या दिवशी |
| २४. | सेवाकाची समालोचन सभा | : सायंकाळी ५.३० वाजता - पहिला शनिवार |
| २५. | पालकांची प्रार्थना | : सायंकाळी ४ वाजता - पहिला रविवार |
| २६. | रात्रभर प्रार्थना | : सकाळी ९.३० वाजता - दुसऱ्या शुक्रवार |
| २७. | उपास प्रार्थना | : सकाळी ९.३० वाजता - तिसऱ्या शनिवार |
| २८. | पवित्र सहभागिता | : दुसऱ्या रविवारच्या उपासनेत |
| २९. | सकाळचे मनन | : पहाटे ५ वाजता - दररोज |
| ३०. | कार्यालयीन स्टाफचे मनन | : सकाळी ९ वाजता - दररोज |
| ३१. | कार्यालय | : सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत (रविवार वगळून) |

## एको ऑफ हिज कॉल टपाल द्वारे अभ्यासक्रम

### १) बायबलकोर

आम्ही नवीन ख्रिस्ती विश्वासणारे आणि अन्य विश्वासातील लोकांकरिता टपालाद्वारे बायबल मधील पायाभूत सत्यांवर इंग्रजीत ५७ पाने, हिन्दी ७६ पाने आणि तामीळमध्ये ९६ पानांचा अभ्यासक्रम देऊ करीत आहोत. तुम्हाला 'न्यु लाईफ फॉर यू' या शिर्षकाचे अभ्यासक्रमाचे पुस्तक देण्यात येईल! **अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला प्रमाणपत्र दिले जाईल. अभ्यासक्रमाकरिता आवश्यक अशी फी आकारली जाणार नाही. तुम्ही आशीर्वादित व्हाल!**

### २) टपालाद्वारे ईश्वर विज्ञान आभ्यासक्रम

हा अभ्यासक्रम सुवार्तिक, ख्रिस्ती पुढारी आणि अरिक्षित सभासद ज्यांना देवाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा करिता इंग्रजीत ५३७ पानांचा आणि तामिळ भाषेत ६५२ पानांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अभ्यासक्रमाची १००० रुपये फी आकारली जाते. त्यामध्ये १४९ अध्याय/पाठ समाविष्ट असलेली एकूण ७ पुस्तके देण्यात येतील. **'सर्टफिकेट इन मिनिस्ट्री'** प्रमाणपत्र देण्यात येईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

***अधीक माहिती करिता आम्हाला लिहा -***

**अध्यक्ष - नहेम्याह बाईबल कॉलेज**

Echo of His Call, Post Box 2957
CHEPAUK, CHENNAI - 600 005.
Ph.: (044) 2852 8282, 2852 9293, 2854 7766,
Cell : 98410 71852, 95661 31858
E.mail : biblecor@yahoo.co.in

## एको ऑफ हिज कॉल

### मासिक (विनामुल्य) मिळविण्याची उत्तम संधी

तुम्ही तुमच्या मित्रांचे/नातेवाईकांचे पत्ते आमच्याकडे पोस्टाद्वारे, पत्राद्वारे, ई.मेल, वॉटस् ॲप किंवा फोन द्वारे पाठविल्यास, आम्ही त्यांना त्यांच्या पत्त्यावर मासिक विनामुल्य पाठवित जाऊ.

## कर सवलत

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**ला भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर ''**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**'' च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | | |
|---|---|---|
| **Account Name** | : | **ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST** |
| **Account Number** | : | **1023 2923 805** |
| **Bank Name** | : | **STATE BANK OF INDIA** |
| **Branch** | : | **TRIPLICANE, CHENNAI - 600 005** |
| **IFSC Code** | : | **SBIN 0000249** |
| **SWIFT Code** | : | **SBI NIN BB 455** |



# खड्ड्यातून महालापर्यंत

# PIT TO PALACE

**"नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !" (मत्तय २४:१५)**

**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**

## माझ्या तारुण्यातील दुसरी बाजु The other side of my youth!

माझ्या तरुणपणात माझ्या ऱ्हदयात देवाविषयी आणि त्याच्या राज्याविषयी अतिशय सलगी होती. देवाचे भय माझ्या जीवनाचा श्वास होते आणि त्याच्या प्रतीची पवित्रता जीवनाचा मध्य - होता. देवाने मला त्याच्या मजविषयीच्या हेतू आणि मजविषयीची काळजी माझ्या हृदयात कमी न होऊ देता त्याने मला मार्गदर्शन केले. देवाच्या बाबतीत माझे मन अतिशय स्वच्छ होते आणि जगीक बाबतीत आडमुठे होते. माझे प्रार्थना जीवन अतिश कळकळीचे होते. या सर्वापेक्षा अधिक मी माझ्या जीवनातील प्रत्येक क्षण हा मोठ्या आशीर्वादाचा आणि सन्मानाचा गणत होतो.

देवाकरिता काहीतरी भक्कम करावे अशी माझी आंतरिक इच्छा मजमध्ये एक नवीन मनुष्य घडवून स्वत:ची महत्त्वकांक्षा उध्वस्त करीत आहे हे मला जाणवत होते. मजकडे एक निश्चित केंद्रित आणि आत्मिक नियंत्रीत मार्गदर्शन होते, जे जगाला समजु शकत नव्हते.

ख्रिस्ताची सुवार्ता लोकांप्रत नेण्याची इच्छा मजमध्ये सतत पेटत होती. तेव्हा माझ्याच विचारांचे नेलाराईकोनम गावामधील सी.एस्. आय्. मंडळीतील बंधु मित्र एस्. अब्राहाम, जे. अलबर्ट देवदास, पी. साराज, वाय्. थंगामणी, एस्. पौलस, जे. जॉर्ज रॉबीनसन, एस्. बेनसन जेसुदास, बहिणी - डी. बेबी सुसीला आणि जे. कनागम्मल मला येऊन मिळाले. १० ऑगस्ट १९६९ रोजी देवाच्या कृपेने, '**गुड न्युज प्रेअर बॅण्ड**'चा जन्म झाला. आम्ही मंडळ्यांमध्ये प्रार्थना आणि सुवार्ता सभा घेण्यास सुरूवात केली. या प्रयत्नांचा परिणामी अनेक लोकांचे तारण झाले आणि अनेक जण सेवेत सामिल झाले. अशा समयी, बंधु जी. जयानंदा पॉलमणी, ए. सेलवाराज, वेलसी देवदासन, जॉन रोश कमलम आणि जे. जयचंद्रन हे मजबरोबर सेवेत सामील होण्यास पुढे आले. मी बाजाची पेटी वाजवित असे, वेलसी देवदासन गिटरिस्ट होते, डेविड रेजीनालर आणि जॉन रोश कमालम हे वायलोनीस्ट होते आणि पी. सामराज बोंगो वाजवीत होते. आमची वादावृंदाची सुवार्ता टिम लोकांना विनामुल्य सुवार्ता देखील सांगत असे.

गावातील मंडळी व्यतिरिक्त, आम्ही थुकालय, नेय्युर, उद्यारवीलई, कोलाचल, कारुंगल, कुझीथुराई, माश्थनदम, कदामालई कुंदरु, नागरकोईल, मुवागुमुगम, पालीयागडी, पेची परी, कोधायार, कन्याकुमारी, मुट्टम आणि आणखीन कांही ठिकाणी सुवार्ता सभा घेतल्या.

अनेक तरुणांनी, वयस्करांनी आणि लेकरांनी त्यांचे जीवन ख्रिस्ताला समर्पित केले. विशेषकरून तरुणांनी त्यांच्या पापी मार्गाबद्दल पश्चाताप करून देवामध्ये जीवन जगू लागले. अनेक आजारी बरे झाले आणि भूतग्रस्तंची बंधनातून मुक्तता झाली. यामुळे मला नवीन उत्साह प्राप्त झाला आणि मी १५ ते २० मैलांपर्यंत पायी चालत जाऊन सुवार्ता हस्तपत्रिका वाटू लागलो. इतरांना वाटले की मी वेडा झालो आहे. परंतु माझ्या आई-वडीलांना मी देवाचे लेकरु आहे हे समजले.

माझ्या सेवेच्या सुरूवातीच्या समयात मला जरी इतर



**बंधु वेस्ली देवदासन**
**(हेरॉल्ड ऑफ हीज कमिंग)**



**जॉन रोश कमलम**
**(प्रेस्बीटीयन, चर्च ऑफ साउथ इन्डिया)**



**रेव्ह जे. जयचंद्रन**
**(प्रेस्बीटीयन)**



**बंधु डेविड रेजीनाल्ड**
**(अदिक्षीत उपदेशक)**



कोणाकडूनहि आधार किंवा उत्तेजन मिळत नव्हते, तरी मी सेवेसाठी आवेशी होतो. अशा परिस्थितीत देवाने मला माझ्या 'छापील पानांच्या द्वारे सेवेच्या पुढील टप्याकरिता मार्गदर्शन केले.

***********

पान ७ वरुन

इच्छाच नाही. काही वेळा देवाचे महान असे सेवक देखील लोकांना मंदिरात - उपासनेला जाण्यास उत्तेजन देत नाहीत. उपासना मंदिरात एकत्र येऊन उपासना करावी अशी देवाची आज्ञा आहे हे आपल्याला ठाऊक आहे. परंतु प्रसिद्ध सुर्वातिक रविवारी त्यांचे कार्यक्रम टि. व्ही. वर प्रदर्शीत करतात. अशा हेतुने कि त्यांच्या स्वत:करिता आणि यांच्या सेवेकरिता अधिक पाठबळ प्राप्त व्हावे. ज्या सुवार्तिकांनी मंडळी आणि लोकांनमध्ये पुलाप्रमाणे असावयास हवे, ते लोकांना वळवतात आणि मंडळ्यांत विभाजन करतात. अर्थात, असे कार्यक्रम वृद्धांकरिता आणि घराबाहेर जाऊ न शकणाऱ्या आजाऱ्यांसाठी उपयुक्त आहेत. असे लोक घरी राहून कार्यक्रम पाहू शकतात, परंतु इतरांनी मंदिरात गेले पाहिजे. सुवार्तिकांनी सुदृढ प्रकृतिच्या लोकांना उपासनेला रहाण्यास सांगितले पाहिजे.

## ५. निर्णय घेण्यात अढळ असा यहोशवा -

धोकादायक - आणिबणीच्या समयात यहोशवाने निर्णायक निर्णय घेतले. चांगले निर्णय घेणाऱ्यांना देव उंचावतो, आपण निर्णय घेण्यात भक्कम असावे व त्यामध्ये ठिकून राहावे. देव अशा लोकांना उंचावतो. यहोशवाने इस्राएल लोकांना त्यांनी केवळ परमेश्वराचीच सेवा करावी - उपासना करावी असे सांगितले आणि त्यांच्या पुढे स्वत: उदाहरण झाला, ''मी आणि माझे घराणें तर परमेश्वराची सेवा करणार'' (यहोशवा २४:१५). देव मनाने भक्कम आणि धीटपणाने निर्णय घेणाऱ्या व यानंतर आधार न घेणाऱ्या लोकांच्या शोधात आहे.



शिवाय, ज्यांना देवाचे प्रकटीकरण प्राप्त होते, त्यांनी न लाजता किंवा दूरगामी परिणामांचा विचार करून लोकांना सेवा करण्याचा मार्ग दाखवावा. आजच्या सेवाकार्यात दुष्टांत - उद्दीष्ट नाहि, ते पाचारण शिवाय, विश्वास रहित आणि विश्वसनिय शिक्षणाहित आहे. त्यामुळे तारण न पावलेल्यांच्या संख्येत वाढ होत आहे.

आपण आपले जीवन केवळ देवावरच अवलंबून राहून जगावे. विश्वासात स्पष्ट आणि खरे असावे. आपल्या सेवेत अनेक लोक सहभागी होण्यास येतात, अशा वेळी आपण पैशांच्या लाभाचा विचार करण्या ऐवजी त्यांना ख्रिस्ताने दिलेल्या शिकवणीप्रमाणे पापांबद्दल पश्चाताप करून पवित्रतेचे जीवन जगण्यास प्रवृत्त करावे, कारण जग प्रति दिवशी वाईटा पासून दुष्टतेकडे वाहत चालले आहे. लोकांना या भयंकर अशा धोकादायक दुष्टतेपासून मोकळे करण्याकरिता यहोशवाप्रमाणे भक्कम - दृढ असा निर्णय घ्या. तुमचे जीवन पूर्णपणे बदलून जाईल. देव तुम्हांस आशीर्वाद देईल!

***********

### स्तोत्र १०३ : १-५

१) हे माझ्या जिवा, परमेश्वराचा धन्यवाद कर; हे माझ्या सर्व अंतर्यामा, त्याच्या पवित्र नामाचा धन्यवाद कर.

२) हे माझ्या जिवा, परमेश्वराचा धन्यवाद कर, त्याचे सर्व उपकार विसरुं नको;

३) तो तुझ्या एकंदर दुष्कर्मांची क्षमा करितो; तो तुझ सर्व रोग बरे करितो.

४) तो तुझा जीव विनाशगर्तेतून उद्धरितो; तो तुला दया न करुणा यांचा मुकुट घालतो;

५) ते तुझे आयुष्य उत्तम पदार्थांनी तृप्त करितो; म्हणून तुझे तारुण्य गरुडासारखे नवे होते.

### तातडीची बातमी
### तुमच्या मोबाईल संदेशाबद्दल

आम्हाला आमच्या मित्रांकडून दररोज मोबाईलवर पुष्कळसे फोटो आणि शास्त्रातील वचने येत आहेत. वास्तवतेत आम्हाला प्रत्येक संदेश पाहाता येणे शक्य होत नाहि. त्यामुळे ते डिलीट करण्याशिवाय आमच्याकडे दुसरा पर्याय नाहि. त्यामुळे आम्ही अतिशय नम्रतेने विनवित आहेत की असे संदेश पाठवणे टाळा. परंतु तुमच्या प्रार्थना, विनंत्या आणि विशिष्ट संदेश आवश्य पाठवा. त्याचे स्वागत आहे. तुमच्या समजुतदारपणाबद्दल आम्ही आभार मानीत आहोत.

**- पास्टर एस्. सॅम सेल्वा राज**

RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/21-23 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/21-23

## WANTED
### OFFICE STAFF

**Echo of His Call** requires experienced and dedicated typists and computer operators.

Contact: ECHO OF HIS CALL
Cell : 98412 71858
E.mail : sam@echoofhiscall.org

## OUR BANK DETAILS:

### *1. Bank : State Bank of India*

| | |
|---|---|
| Branch | : **Triplicane, Chennai-5** |
| Name | : **S. Sam Selva Raj** |
| A/C No. | : **1023 2934 679** |
| IFSC | : **SBIN 00 00 249** |
| SWIFT CODE | : **SBI NIN BB 455** |

### *2. Bank : ICICI Bank*

| | |
|---|---|
| Branch | : **Anna Salai, Chennai-6** |
| Name | : **Echo of His Call** |
| A/C No. | : **6038 0502 2319** |
| IFSC | : **ICIC 000 6038** |

### *3. Bank : State Bank of India*

**(This Account is for Tax Exemption for Indians only )**

| | |
|---|---|
| Branch | : **Triplicane, Chennai-5** |
| Name | : **Echo of His Call Educational Trust** |
| A/C No. | : **1023 2923 805** |
| IFSC | : **SBIN 00 00 249** |

**Google Pay: 98410 71858**
**PayPal : SAM SELVA RAJ**

*****

**E.mail : sam@echoofhiscall.org**

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य. गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-      आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.com

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

RNI NO. 70106/98
**Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/21-23**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/21-23**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel"**
**on 12th SEPTEMBER 2022**
**If un-delivered please return to:**
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
**P.O. Box No. 2957,**
**Chepauk, Chennai - 600 005, INDIA.**
**Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766**

## *JESUS LOVES YOU!*

**To**

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No. 18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by him at **Echo of His Call Printers**, New No. 8 & 10, Old No. 18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**